# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
## (अधिष्ठाता यांचे कार्यालय)
**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED**

PH NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com


जा.क्र. वैमअं/किभांवि/दरपत्रके मागणी/ 6928 /२०२० दिनांकः- 22/०९/२०२०

कार्यालयीन आदेश

विषय :- विद्युत व इ. किरकोळ साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत...

संदर्भ :-१.दि.२४.०४.२०२० रोजीची खरेदी समितीची बैठक.

२.दि.१८.०९.२०२० रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग, प्रशासकीय कार्यालय व वैद्यकीय विद्यार्थी वस्तीगृहांकरीता विद्युत व इ. किरकोळ साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे सोबत जोडलेल्या यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 29/09/ २०२० रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 30/09/२०२० रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | साहित्यांचे नाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.२२ पर्यंतची यादी जोडण्यात आलेली आहे. | एकुण २२ नग | ... |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.
२. दरपत्रक धारकाकडे सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
३. दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (**NA**) असे नमुद करावे.
४. दरूपत्रका सोबत शासन मान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना देण्यात आलेला आहे.)
५. दरपत्रकातील साहित्यांचे दर शासन नियमानुसार सर्व करांसहित बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.
६. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.
७. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.
८. पुरवठा करण्यात येणारे साहित्य वैध कालावधीचे व चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.
९. तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदी बाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.
१०. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रत:- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता लागणाऱ्या खालील प्रमाणे विद्युत व इ.किरकोळ साहित्यांचे दरपत्रक देण्यात यावे.

| Sr.no. | Name of the Item | Qunt. | Rate |
|---|---|---|---|
| ०१ | एल.ई.डी.टयुब लाईट २० वॅट | ०१ नग | |
| ०२ | एल.ई.डी.फोकस ३६/४० वॅट | ०१ नग | |
| ०३ | एल.ई.डी.फलड लाईट ५० वॅट | ०१ नग | |
| ०४ | एल.ई.डी. फलड लाईट १०० वॅट | ०१ नग | |
| ०५ | एल.ई.डी. फलड लाईट २०० वॅट | ०१ नग | |
| ०६ | एल.ई.डी.बल्ब १८ वॅट | ०१ नग | |
| ०७ | एल.ई.डी.बल्ब १४ वॅट | ०१ नग | |
| ०८ | एल.ई.डी.बल्ब ०९ वॅट | ०१ नग | |
| ०९ | सिलिंग फॅन | ०१ नग | |
| १० | इलेक्ट्रीक चौक ३६ /४० वॅट | १ नग | |
| ११ | पीव्हिसी वायर१.५ (फलेक्झीबल) | (९० मीटर) ०१ बंडल | |
| १२ | थ्री-कोर वायर (फलेक्झीबल) | (९० मीटर) ०१ बंडल | |
| १३ | टॉप पीन ०५ ॲम्पीयर | ०१ नग | |
| १४ | टॉप पीन १५ ॲम्पीयर | ०१ नग | |
| १५ | मोडयुलर पावर बोर्ड ०५ ॲम्पीयर (४स्वी.+४ स्वॉ.) | ०१ नग बोर्ड | |
| १६ | मोडयुलर पावर बोर्ड १५ ॲम्पीयर (४स्वी.+४ स्वॉ.) | ०१ नग बोर्ड | |
| १७ | सर्विस वायर ४ एम.एम. | (९० मीटर) ०१ बंडल | |
| १८ | पाणबुडी मोटर ( ३ एच.पी.फेज संपवेल) | ०१ नग | |
| १९ | इलेक्ट्रीक बेल (वायर लेस) | ०१ नग | |
| २० | टेलिफोन वायर | (९० मीटर) ०१ बंडल | |
| २१ | यु.पी.एस. ६०० वॅट | ०१ नग | |
| २२ | सिलींग फॅन रेग्युलेटर | ०१ नग | |

नोट :- उपरोक्त प्रमाणे सर्व साहित्य चांगल्या प्रतीचे टिकाऊ तसेच बाजारभावा प्रमाणे रास्त असणे आवश्यक आहे. तसेच सदर दरेपत्रका सोबत मागणी करण्यात आलेले आपल्या फर्मचे सर्व प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा दरपत्रके रद्य करण्यात येतील.तसेच रद्य केलेल्या संबंधीत दरपत्रकाबाबत लेखी कळविण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

मा. अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या साहित्यांच्या दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असुन आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही. तसेच याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

ठिकाण :-

नाव :-

पत्ता :-

मो.नं. :-